*One Day National Conference on*

# NATIONAL EDUCATION POLICY 2020 AND ITS IMPLEMENTATION : EMERGING CHALLENGES TO EQUITY, SOCIAL JUSTICE AND QUALITY

*Organized by*

**DR. BABASAHEB AMBEDKAR TEACHERS ORGANIZATION (DBATO)**

Rashtrasant Tukadoji Maharaj Nagpur University

*In Participation With*

**DEPARTMENT OF SOCIAL JUSTICE AND SPECIAL ASSISTANCE, GOVERNMENT OF MAHARASHTRA**

on 17TH August 2024

# CERTIFICATE

This is to certify that Dr. / Mr. / Ms. Supriya R. Pendhari, of Shree sai prasad coll. of Arts Sal... participated in one day National Conference on **"NATIONAL EDUCATION POLICY 2020 AND ITS IMPLEMENTATION : EMERGING CHALLENGES TO EQUITY, SOCIAL JUSTICE AND QUALITY"** as a invited speaker / Paper Presenter.

She / He has presented/delivered lecture / paper on the topic ____________________

| | | | |
|---|---|---|---|
| **Dr. Siddharth Gaikwad**<br>Regional Deputy Commissioner,<br>Department of Social Justice and Special Assistance,<br>Nagpur | **Dr. Omprakash Chimankar**<br>President, DBATO. | **Dr. Vikas Jambhulkar**<br>Working President, DBATO. | **Dr. Shrikant Bhowate**<br>Secretary, DBATO. |

# DR. BABASAHEB AMBEDKAR TEACHERS ORGANIZATION (DBATO)

Rashtrasant Tukadoji Maharaj Nagpur University

"Deepshri", Plot 8, Jaibhim Co-op. Hou. Society, Chandramani Nagar, 9 Acre, Nagpur - 440027

No. 065 **Receipt** Date : 17 / 8 /2024

Received with thanks from Dr./Mrs/Mr./Ms./ Supriya Pendhari

In Cash / Cheque / DD. No./ 1,1001- of

Bank _____ Dated 17 / 8 /2024 towards Conference Registration / Sponsorship / Donation.

₹ 1,1001-

E-mail ID _____ Mob. No.

Receivers Signature

## —शोधनिबंध—

### भारतीय समाजाच्या विविधांगी समस्येत दर्जेदार शिक्षणाची उपलब्धता आणि समानता

✠✠✠✠✠✠✠✠✠✠✠✠✠✠✠✠✠✠✠✠✠✠✠✠✠✠✠✠✠✠✠✠✠✠✠✠✠

मानवी जीवनाच्या मूलभूत गरजांपैकी शिक्षण ही अत्यंत महत्वाची गरज आहे. त्यातही 21 व्या शतकात शिक्षणाची गरज किती महत्वपूर्ण आहे हे अनेक उदाहरणांद्वारे सिध्द झालेले आहे. आधुनिक शिक्षण प्रणालीत ज्या तत्वांचा अंगीकार करण्यात आला त्या तत्वांना प्रत्यक्ष शैक्षणिक अनुभूतीतून साकार करणे ही दर्जेदार शिक्षणातील एक महत्वपूर्ण कल्पना. कारण, शिक्षण हे केवळ पोट भरण्याचे साधन नसून सामजिक समस्यांवर मात करुन प्राप्त परिस्थितीतील विविध समस्या सोडविण्यास व्यक्तीस समर्थ करणारी प्रक्रिया आहे.

समाजात राहणाऱ्या प्रत्येक व्यक्तीमध्ये आपलेपणाची भावना असावी. यालाच राष्ट्रीयत्व शिक्षणाच्या माध्यमातून जोपासता येते. कारण समाजात भिन्न भिन्न स्वभावाच्या अनेक व्यक्तींना आपण पाहतो. अशा भिन्न स्वभावाच्या व्यक्तींशी जुळवून घेणे हे देखील व्यक्तीला मिळणाऱ्या शिक्षणाद्वारे व संस्काराद्वारेच शक्य होते. व्यक्ती आणि त्याच्या भोवतालचा परिसर व समाज यांच्याशी सुसंवाद साधणे म्हणजे समायोजन असते अशा प्रतिकुल परिस्थितीतही सुसंवाद साधणे केवळ दर्जेदार शिक्षणामुळे साध्य होऊ शकते. त्यातूनच व्यक्तीला आनंद, समाधान लाभते. या अर्थाने समायोजन ही प्रक्रिया केवळ दर्जेदार शिक्षणाद्वारे प्राप्त करता येऊ शकते. कारण, ती अध्ययन प्रक्रिया आहे.

व्यक्तीला आपल्या जीवनात अनेक प्रकारच्या समस्या भेडसावत असतात. भिन्न भिन्न व्यक्तिमत्व असणाऱ्या व्यक्ती एकत्र आल्या की, त्यांच्यात वेगवेगळे वैचारिक मंथन सुरु होते. त्यातून मतभेद होऊन ते कधी विकोपाला जातात. परंतु त्या व्यक्तींमध्येच एखादी व्यक्ती समंजस असेल तर ती सर्वांशी समायोजन साधते हा समंजसपणा देखील त्या व्यक्तीने घेतलेल्या शिक्षणातूनच त्याला प्राप्त झालेले असते.

जीवन जगत असताना व्यक्तीसमोर कोणते संकट कोणत्या वेळी निर्माण होईल हे कोणीच सांगू शकत नाही तरी व्यक्तीने घेतलेल्या शिक्षणातून ती त्या परिस्थितीला तोंड देते. जीवनात यशस्वी होण्यासाठी शिक्षण हे अत्यंत महत्वाचे साधन आहे. आधुनिक काळातील ही जीवनप्रणाली आणि शिक्षणप्रणाली यांचा मेळ घालणे ही काळाची गरज आहे हे शिक्षण व्यक्तीला औपचारिक, अनौपचरिक तसेच स्वाभविकपणे दिले जाऊ शकते. पैकी औपचारिक शिक्षणात निश्चित उद्देश असतो. यासाठी ज्ञानग्रहणाची व ज्ञान दानाची प्रक्रिया हेतुपुरस्कार सुरु असते. तर अनौपचारिक शिक्षण कक्षेच्या बाहेर दिले जाते व सहजासहजी जे प्राप्त होते त्याला स्वाभाविक शिक्षण असे म्हणतात.

या उपरोक्त तीनही प्रक्रियेद्वारे व्यक्ती शिक्षण घेत आहे. या तीनही प्रक्रियेतुन व्यक्तीला दर्जेदार शिक्षण उपलब्ध करुन दिले गेले आहे. कारण जीवन हे या प्रकारच्या शिक्षणाचा केंद्रबिंदु आहे. जीवनात येणाऱ्या विविध समस्यांवर मात करण्यासाठी हे शिक्षण युवकांना देणे क्रमप्राप्त ठरु लागले कारण, हे शिक्षण जीवनातील कोणत्या ना कोणत्या व्यवहाराशी किंवा समस्येशी संबंधित असते. विविध कला, धर्म, राजकारण, समाज, मुल्यशिक्षण, कुटुंबकल्याण शिक्षण, शेती–विषयक शिक्षण, व्यावसायिक शिक्षण इ. शिक्षणाचा यात समावेश होतो. या सर्व प्रकारच्या शिक्षणासाठी व्यापक कार्यक्रम तयार केला गेला. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 च्या अन्वये या सर्व शिक्षणाची तरतुद केली गेली व त्यात समानता आणण्याच्या प्रयत्न झाला. व आंतराराष्ट्रीय सामंजस्याचा दृष्टिकोन विद्यार्थ्यांमध्ये विंकसित करण्याचा प्रयत्न केला गेला. या धोरणामागील मुख्य उद्देश म्हणजे 'शिक्षणाचे सार्वत्रिकरण करणे आणि भारताला जागतिक ज्ञान महासत्ता बनवणे'.

या उद्देशाची पूर्तता होण्यासाठी शैक्षणिक सत्र 2024–25 निवडण्यात आले या धोरणांतर्गत डिजिटल साक्षरता, कौशल्यविकास आणि सर्वांगीण शिक्षणावर लक्ष केंद्रित करुन सर्वसमावेशक, सर्वांना समानता प्रदान करणारी तत्वप्रणाली निश्चित झाली. व त्यानुरुप अभ्यासक्रम तयार करण्यात आला.

नवीन शैक्षणिक धोरणामागे जो दुरदर्शीपणा ठेवला गेला त्याचे पुरगामी परिणाम देखील लक्षात घेतले गेले. त्यामुळे हे नवीन शैक्षणिक धोरण देशाच्या शैक्षणिक प्रवासातील एक महत्वाचा टप्पा आहे. हे शैक्षणिक धोरण विद्यार्थ्यांचे प्रवेश, समानता, गुणवत्ता, क्षमता आणि जबाबदारी या पाच प्रमुख घटकांवर आधरित आहे.

त्यामागे महाविद्यालयीन शिक्षण आधिक समग्र बहुविद्याशाखीय आणि लवचिक बनविणे हे प्रमुख उद्देश आहेत. तसेच व्यावसायिक आणि औपचारिक शिक्षण यातील अंतर कमी करण्याचा मानस यामागे आहे. या धोरणाच्या अंमलबजावणीमुळे आधिक पारदर्शकता निर्माण होईल. या धोरणानुसार प्रत्येक प्रवेशित विद्यार्थ्यांची प्रगती व त्याची शिक्षण घेण्याची क्षमता यांचा मागोवा घेता येईल. केवळ ज्ञान आणि कौशल्य यापुरते शिक्षण मर्यादित राहणार नसून प्रशिक्षित समुपदेशक आणि सामाजिक कार्यकर्त्यांच्या समावेशावर विचार केला जाईल. तसेच ऑनलाइन अभ्यासक्रम यासारख्या दर्जेदार शिक्षणाची उपलब्धता केली जाईल. या शिक्षणक्रमात तयारीचे तीन टप्पे असतील. पहिल्या टप्प्यात अभ्यासक्रमात स्मरणशक्तीऐवजी संकल्पना समजून घेण्यावर आणि त्याचा वापर करण्यावर भर दिला आहे. तर नंतरच्या टप्प्यात विद्यार्थ्यांना प्रकल्प आधारित शिक्षणाची नंतरच्या टप्प्यात विद्यार्थ्यांना प्रकल्प आधारित शिक्षणाची ओळख करुन दिली जाणार आहे. नंतरच्या शेवटच्या टप्प्यात विद्यार्थ्यांला त्याच्या आवडीचे विषय निवडण्याची व आपले करिअर करण्याची संधी उपलब्ध करुन दिली आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाबाबत विचार केला तर असे दिसून येते की, आज परिस्थितीनुरूप या धोरणात बदल होणे अत्यावश्यक होते. शिक्षणाची समान संधी, नियम, प्रशासकीय व्यवस्था, शैक्षणिक ढाचा इत्यादी सर्व घटकांमध्ये या धोरणामुळे अमुलाग्र बदल झाला, तसा प्रयत्न आणि शाश्वत विकासाची ध्येये ठरवून समर्थ व सशक्त शैक्षणिक व्यवस्था उभारणे हे या धोरणाचे ठरवलेले उद्दिष्ट आजच्या काळाचा विचार केला तर अत्यावश्यक होते.

नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामुळे समान संधी तर मिळणार आहेच परंतु दर्जेदार शिक्षणासाठी ज्या मूलभूत गोष्टींची गरज आहे त्यातील विद्यार्थ्यांमध्ये असलेल्या वैचारिक पातळीत वाढ करण्यासाठी सर्जनशील विचार, चिकित्सक विचार, संभाषण कला, सहकार्य, सहवेदना आणि आत्मविश्वास या कौशल्यावर विशेषत्वाने लक्ष देऊन सर्वांगीण विकास साधण्याचा निश्चितच प्रयत्न असणार आहे. युवा वर्ग सक्षम हो, त्यांच्या वाढत्या अशा अपेक्षा आकांक्षा पूर्ण होण्यास दर्जेदार शिक्षणाची गरज या धोरणाद्वारे नक्कीच पूर्णत्वास जाणार आहे. कोरोना नंतरच्या काळाचा जर विचार केला तर दोन वर्षात विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीची वाटचाल मंदावलेली असल्याचेच चित्र सर्वत्र पाहायला मिळते. त्यामुळे तब्बल 34 वर्षानंतर नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 29 जुलै 2020 रोजी मंजूर झाले. या धोरणात अमुलाग्र बदल करण्यात आला 2020 मधील या नवीन

शैक्षणिक धोरणापूर्वी म्हणजेच भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर नागरिकांची निरक्षरता दूर करण्यासाठी वारंवार प्रयत्न करण्यात आले. त्यासाठी वेगवेगळ्या कार्यक्रमांची अंमलबजावणी करण्यात आली. कार्यक्रमांची रुपरेषा व आराखडा तयार करून संदर्भानुसार कार्यक्रमांचे नियोजन करण्यात आले. त्यातील महत्त्वाचा भाग म्हणजे शिक्षण आयोगाची स्थापना.

त्यानंतर पहिले राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 1968 मध्ये लागू करण्यात आले. त्यानंतर मुदलियार आयोग, कोठारी आयोग प्रस्तावित केले गेले. 1968 च्या धोरणानंतर दुसरे शैक्षणिक धोरण 1986 मध्ये ठरवण्यात आले. त्यात 1992 मध्ये काही प्रमाणात बदल करण्यात आला. 2009 मध्ये तर मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार नियम (RTE ACT 2009) संमत केला गेला. या कायद्याने प्रत्येक बालकाला प्राथमिक शिक्षणाचा अधिकार मिळाला. ही प्रक्रिया 2019 पर्यंत सुरू राहिली. मसुदा तयार करण्यास विविध शास्त्रज्ञांनी, तत्त्वज्ञांनी मार्गदर्शन केले व शेवटी मानव संसाधन मंत्रालयाला मे 2019 मध्ये डॉक्टर के कस्तुरी रंगन यांच्या अध्यक्षतेखाली नऊ सदस्य समितीने आपला अहवाल सादर केला. या अहवालावर जवळपास दोन लाख लोकांनी आपली मते नोंदवली हे विसरता येणार नाही.

याच धोरणाची अंमलबजावणी शैक्षणिक सत्र 2024–25 पासून सर्वत्र होऊ घातली आहे. दर्जेदार शिक्षण प्राप्त करण्याच्या एकमेव उद्दिष्टा मध्ये कला आणि विज्ञान, अभ्यास आणि अभ्यासेतर कार्यक्रम, व्यावसायिक आणि शैक्षणिक प्रवाह यांच्यामध्ये कोणतेही स्पष्ट विभाजन नको असे झाले म्हणजे ज्ञानाच्या क्षेत्रातील नुकसानकारक उच्चनीचता आणि त्यांच्यात निर्माण झालेले अंतर दूर होऊन जवळीकता व समानता निर्माण होईल. सर्व ज्ञानाची एकता आणि अखंडता सुनिश्चित करून एका पातळीवर विविध विषय निवडून त्यात बहुआयामी शिक्षणाचा समावेश करण्यात आला. विज्ञान, समाजशास्त्र, कला, मानसशास्त्र, खेळ इत्यादी सारख्या विषयाचे सर्व समावेशकत्व साधून समग्र शिक्षणाचा विकास करण्यात आलेला आहे. त्यामुळे सर्व शैक्षणिक निर्णयांमध्ये पूर्ण समानता आणि सर्व समावेशकता असणार आहे. उच्च शिक्षणापर्यंत सर्व पातळ्यांवरील अभ्यासक्रमात सुसूत्रता आणली गेली आहे. प्रत्येक अभ्यासक्रमात क्रेडिट पद्धतीने मूल्यांकन करणार असल्याने सातत्यपूर्ण संशोधन व त्याचा आढावा यांना प्राधान्य देण्यात येणार आहे. विद्यार्थी स्वतः आपल्या प्रगतीचा आढावा घेऊ शकतील स्वतःचे मूल्यांकनही करू शकतील. सर्व महाविद्यालयात एकाच सामायिक प्रवेश परीक्षा

असणार त्यामुळे **NTA** मार्फत घेतल्या जाणाऱ्या परीक्षेत समानता व दर्जेदारपणा येणारच यात शंका नाही. मात्र ही परीक्षा ऐच्छिक असेल. अशा विविध वैशिष्ट्यपूर्ण घटकांनी युक्त **NEP** नवीन शैक्षणिक धोरणांमुळे समाजात अमुलाग्र बदल दिसून येईलच. प्रत्येक विद्यार्थ्याने या धोरणातील घडामोडी, नोंदी लक्षात मात्र घ्यायला हव्या.

भारताच्या शिक्षण प्रणालीला आकार देण्याची क्षमता या नवीन शैक्षणिक धोरणात नक्कीच आहे. शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्यासाठी दर्जेदार शिक्षणाची उपलब्धता आणी भारतीय सामाजातील सामाजीक–आर्थिक विषमता दुर करण्यासाठी नक्कीच प्रयत्न व अंमलबजावणी यातून होईल. पण यासाठी खाजगी व सरकारी संस्थांमध्ये सहकार्य आवश्यक आहे, यात तीळमात्र शंका नाही. अशा धोरणामुळे भाविष्यात भारत जागतिक शैक्षणिक केंद्र म्हणून नक्कीच उच्च स्थान प्राप्त करेल. प्रत्येक विद्यार्थ्याला आपल्या अभिरुची नुसार विषय निवड करण्याची संधी मिळाल्यामुळे अभ्यासात लवचिकता आणता येईल. शिक्षणाचा दर्जा उंचावेल व जगाच्या बरोबरीने शिक्षण दिल्याचे समाधान मिळेल. या शैक्षणिक धोरणामुळे सर्वत्र समानता आणण्यामागील प्रमुख कारण म्हणजे पदवीच्या पहिल्या वर्षी विद्यार्थ्यांना क्रेडिट गुणांकन पध्दतीनुसार अभ्यासक्रम शिकवला जाणार आहे. राज्यातील सर्व विद्यापीठांच्या महाविद्याल्यात विषयांचे क्रेडिट एकसमान असणार आहे. किंबहुना हे शैक्षणिक धोरणच एका सामान्य सुत्रावर (5+3+3+4) आधारित आहे. ज्यामध्ये विद्यार्थ्यांवर कोणत्याही भाषेचा दबाव राहणार नाही शिक्षणाचा पाया मजबूत होणे हा उद्देश समोर ठेवून स्थनिक भाषा आणि संस्कृतीवर भर दिला गेला आहे. याशिवाय गंभीर विचारांना प्रोत्साहन देऊन सर्वसमावेशकता या गुण वैशिष्टयामुळे विविध विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी समान संधी उपलब्ध होणार आहे. थोडक्यात, सर्वांगीण शैक्षणिक वातावरण निर्माण करण्यासाठी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2023 या मुद्यावर विचार करत आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वागीण विकासासाठी जीवन कौशल्य, मूल्य शिक्षण, व्यावसायिक सामग्री, हवामान बदल जागरुकता, विविध प्रकल्पावर आधारित संशोधन यासारख्या क्षेत्रांचा समावेश होते. आधुनिक काळाशी तडजोड करण्यासाठी आजच्या तरुण पिढीला अशा प्रकारचे शैक्षणिक धोरण निश्चितच उज्ज्वल भविष्याकडे वाटचाल करण्यास उपयुक्त ठरेल यात शंका नाही पुढील 25 वर्षात भारताला कुशल मनुष्यबळाचे जागतिक केंद्र बनविण्यासाठी जी अपेक्षा केली जाते ती फळाला येईल हे देखील निर्विवाद सत्य आहे. त्याची अंमलबजावणी सुरु झालेली आहे सर्वच विद्यार्थी, संस्था शैक्षणिक

कार्य करणारी ठिकाणे यादृष्टीने अग्रेसर होऊन या धोरणाची अंमलबजावणी यशस्वीपणे होईल हीच शेवटी अपेक्षा.

**गोषवारा:** उपरोक्त सर्व मुद्द्यांवर निष्कर्ष नमूद करतांना असे म्हणता येईल की, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2023 ही शिक्षण क्षेत्रातील अत्यंत महत्त्वाची बाब आहे, परिवर्तन आहे. तिची आवश्यकता बऱ्याच काळापूर्वी होती. या परिवर्तन प्रक्रियेत जी वैशिष्ट्ये समाविष्ट करण्यात आली आहे त्यामुळे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्वावर निश्चितच परिणाम होणार आहे. सत्य परिस्थिती लक्षात घेता विद्यार्थ्यांमधील शिक्षणाबद्दलचा निरुत्साह, मग तो विद्यार्थी कोणत्याही क्षेत्रातील असो, कोणत्याही शाखेचा असो, त्याची सामाजिक आर्थिक परिस्थिती कशीही असो, तो कमी करणे किंबहुना नाहीसा करणे हा या धोरणातील उच्च दर्जाचे शिक्षण देण्यामागील नवीन दृष्टिकोन आहे. शिक्षणाबद्दलची अभिरुची वाढविण्यासाठी तंत्रज्ञान आणि ऑनलाइन संसाधनाचा वापर करण्याचाही या धोरणात विचार केला गेला आहे. ज्यामुळे विद्यार्थी सर्जनशील, बहुविद्याशाखीय शिक्षण प्राप्त केलेला, गंभीर विचार करणारा एकात्मिक दृष्टिकोन अंगीकारणारा असा निपजेल. या शैक्षणिक फ्रेमवर्क मध्ये हे परिवर्तनात्मक आणि अग्रेषित विचार समायोजन समकालीन वातावरणावरुरूप तयार केले व ते विकसित करण्यावर भर देण्यात आला. याचा परिणाम आपल्या देशातील विद्यार्थी आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या विद्यापीठातून पदवी घेऊ शकेल. भविष्यकाळात विद्यार्थी हा प्रयत्न करतीलच कारण, या धोरणामुळे शैक्षणिक प्रणालीच्या वेगवेगळ्या वाटा शोधण्याची संधी विद्यार्थ्यांना प्राप्त झाली आहे असे वाटते. विद्यार्थी करिअर निवडतील व त्यांच्यातील उदासिनता नष्ट होऊन ते नवनवोन्मेषाने नवीन तंत्रज्ञान आत्मसात करून प्रगतीच्या अत्युच्च शिखरावर पोहचतील व आपल्या भारतातील विविधांगी समस्येवर मात करून घवघवीत यश संपादन करतील ही शक्यता नाकारता येणार नाही. या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात अंतर्भूत असलेल्या सर्व प्रभावी घटकांमुळे भविष्य काळात नवीन पिढी नव्या शिक्षणाच्या वाटेवर चालताना नव्या शैक्षणिक धोरणाचा स्वीकार करून प्रगत राष्ट्राच्या निर्मितीमध्ये आपले अमूल्य असे योगदान प्रदान करेल असा आशावाद व्यक्त करायला हवा .

**डॉ. सौ. सुप्रिया राजेश पेंढारी**

**श्री. साई प्रसाद कॉलेज ऑफ आर्टस् सालवा**

**जि. नागपूर**

## – संदर्भ सूची –


**1) शिक्षणातील बदलते विचार प्रवाह :**

– डॉ.रमा अश्विनीकुमार भोसले

– डॉ. उज्ज्वला मधुकर डोणे

फडके पब्लिकेशन, पुणे.

**2) उदयोन्मुख भारतीय समाजातील शिक्षण**

– डॉ. सुरेश करंदीकर

– मीना मंगरुळकर

फडके प्रकाशन, कोल्हापुर.

**3) शिक्षणातील विचार प्रवाह**

– डॉ. निलिमा सप्रे

– प्रा. प्रीती पाटील

फडके प्रकाशन, कोल्हापूर

4) राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 1986

5) नवीन शैक्षणिक धोरण 2020

6) नवीन शैक्षणिक धोरण 2023